MHST200012092020

## वि.दि.दा.क्र.१९८/२०२३ मधील निशाणी क्र.८९ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुद्ध झालेला पुरावा बंद आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी आणि प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. सदर दावा साठेखतावरुन खरेदीपत्र करुन मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत दाव्यात वादी क्रं.१ ने त्याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दि.०३.०८.२०१८ रोजी नि.६७ नुसार दाखल केले होते व सदरचे प्रतिज्ञापत्र दि.१८.१०.२०१९ रोजी माझे विद्वान पुर्वपिठासीन अधिकारी यांनी वादी गैरहजर असल्याने रद्द केले. त्यानंतर वादी मदन पोरे याचे पुराव्याचे शपथपत्र दि.०७.०७.२०२५ रोजी दाखल करण्यात आले. वादींना वारंवार संधी देवुन देखील ते उलटतपासासाठी उपस्थित राहिलेले नाहीत. त्यामुळे दि.१३.१०.२०२५ रोजी वादी मदन पोरे याचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले व वादींविरुद्ध पुरावा बंदचा आदेश पारीत करणेत आला. परंतु, सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तूत वादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. उलटपक्षी त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्यामुळे त्यांना याकामी पुरावा देण्यास परवानगी देणे

न्यायोचित वाटते. परंतु, सदर दाव्यात झालेल्या विलंबाबाबत वादींवर खर्चाची जास्तीत जास्त रक्कम लादणे क्रमप्राप्त आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

**आदेश**

१) अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२) वादी यांनी खर्चाची रक्कम रुपये ३०००/- (रक्कम रुपये तीन हजार फक्त) जमा करावी. त्यापैकी रक्कम रुपये १,५००/- प्रतिवादी क्रं.४ यांना दयावी व उर्वरीत रक्कम सरकार जमा करावी.

३) वादींनी नि.क्रं.८६ वर खर्चाच्या रकमेची देखील पुर्तता करावी.

४) सदर खर्चाची पुर्तता केल्यानंतर वादी मदन पोरे याचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल करुन घेण्याचा आदेश व वादींविरुद्ध झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करण्यात येतो.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2026.01.13 14:55:12 +0530

स्थळ : वाई.
दिनांक : १२/०१/२०२६

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.